# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

रौप्य महोत्सवी वर्ष
१९७९-२००४

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com


**क्र. मजीप्रा/सस/आस्था-४/** **दिनांक : ४ मे, २००५**

विषय : **महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि. १९ एप्रिल, २००५ रोजी झालेल्या १०० व्या सभेचे इतिवृत्त.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०० वी सभा दिनांक १९ एप्रिल, २००५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. मंत्री महोदय, पा.पु. व स्व. यांचे मंत्रालयातील दालन क्र. २०८ येथे संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी यासोबत सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी, ही विनंती.

**सोबत : इतिवृत्त**

( दीपक भसाळे )
सदस्य सचिव

**मा. मंत्री,**
**ग्रा.वि., पा.पु. व स्व.**
**तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. :**

Apr-05/100

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०० व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०० वं. सभा मा. मंत्री, ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९ एप्रिल, २००५ सकाळी ११.०० वाजता संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री.अजित पवार, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष
२. मा.श्री. विजयसिंह मोहिते पाटील, मंत्री, ग्राम विकास तथा म.जी.प्रा.चे सहअध्यक्ष.
३. मा. श्री. रणजित कांबळे, राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा म.जी.प्रा.चे उपाध्यक्ष.
४. श्री. विश्वास धुमाळ, प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
५. श्री. एस. एस. हुसेन, प्रधान सचिव, ग्रा.वि.वि. तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
६. श्री. दीपक भसाळे, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.
७. श्री. गु. अ. नाईक, अवर सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सौ. भारती कामत, अवर सचिव, उर्जा (उद्योग, उर्जा व कामगार विभाग), मंत्रालय, मुंबई.

**या व्यतिरिक्त सदर सभेस खालील मजीप्राचे अधिकारी उपस्थित होते.**

१. श्री. मिलिंद केळकर, विशेष कार्य अधिकारी, पा.पु. व स्व.वि., मंत्रालय, मुंबई.
२. श्री. एस. व्ही. दहासहस्त्र, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., ठाणे.
३. श्री. ए. आर. वर्मा, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., पुणे.
४. श्री. सागर रानडे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., अमरावती.
५. श्री. प्र. वा. पांढरीपांडे, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
६. श्री. बी. एस. पाटील, उप-मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
७. श्री. द. चि. सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), मजीप्रा, मुंबई.
८. श्री. वेंकट कल्याणकर, अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, ठाणे.
९. श्री. एस. पी. भातखंडे, कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
१०. श्री. आर. आर. जगताप, कार्यासन अधिकारी (आ-३), म.जी.प्रा., नवी मुंबई.

मा. मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९९ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दि. २४ नोव्हेंबर, २००४ रोजी झालेल्या मजीप्राच्या ९९ व्या सभेच्या इतिवृत्तास मा. मंत्री, ग्रा.वि., पा.पु.व स्व. यांनी मान्यता दिली असून सदर इतिवृत्त प्राधिकरणाच्या रितसर मान्यतेसाठी सादर केल्याचे विशद करण्यात आले. सदर इतिवृत्ताबाबत सर्वसाधारण चर्चा करण्यात येऊन इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. २ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९९व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती.**

मजीप्राच्या ९९ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले होते त्या निर्णयांच्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाही या कार्यक्रमबाबी व्दारे सादर करण्यात आल्याचे विशद करण्यात आले. या कार्यक्रमबाबी मधील मुद्यावर सर्वकष चर्चा करण्यात येऊन इतिवृत्तावरील कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ३ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००३-०४ वार्षिक लेखे स्विकृत होणेबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या लेख्यामध्ये दर्शविले जाणारे भांडवली जमा आणि खर्च, महसूल व या बरोबरच इतर व्यवहार की जे पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांच्या संबंधीत आहेत त्याबाबतची माहिती वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी संचालक मंडळासमोर सविस्तरपणे विशद केली. सदर माहिती विशद करित असताना वर्षभराच्या कालावधीत प्राधिकरणास अस्थापना, हत्यारे व सयंत्रे (ई.टी.पी.) आकारणीच्या प्राप्तीतून रुपये ७५.९० कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली आहे. अशी माहिती देत असताना मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांनी प्राधिकरणास अस्थापनेपोटी वर्षभरात किती खर्च येतो याची विचारणा केली. त्यावर श्री. बी. एस. पाटील, उप मुख्य लेखा अधिकारी यांनी अस्थापनेपोटी प्राधिकरणास सुमारे रु. १०२ कोटी इतका खर्च येतो असे सांगीतले. त्यावर मा. प्रधान सचिव, यांनी सदरचा खर्च भागविण्याबाबत काय उपाययोजना केल्या आहेत याबाबतची सविस्तर माहिती सादर करण्याविषयी सांगीतले. बऱ्याच प्रादेशिक तसेच स्वतंत्र पाणी पुरवठा योजना या पूर्ण होऊन त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेकडे हस्तांतर न केल्यामुळे या योजना

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

चालविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचा वेतन व भत्त्याचा खर्च प्राधिकरणास नाहक सहन करावा लागत असल्याबाबतची बाब संचालक मंडळाच्या निदर्शनास आणली असता प्रादेशिक तसेच स्वतंत्र पाणी पुरवठा पूर्ण झाल्यानंतर त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थाकडे हस्तांतर करण्याबाबत प्रयत्न करावेत अथवा सदरची योजना प्राधिकरणा मार्फत चालवून त्या योजनेची प्रत्यक्ष ग्राहकांकडून मजीप्रानेच पाणीपट्टी वसूली शासनाच्या परवानगीने करण्यात यावी असे सूचीत करण्यात आले.

योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने जरुरतर पाणीपट्टीच्या दरात वाढ करावी असेही सूचित करण्यात आले. शक्य झाल्यास थकित रक्कम वसूल करणेबाबत व पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर त्या त्या स्वराज स्थानिक संस्थेकडे हस्तांतर करणेबाबत नवीन कायदा करावा किंवा कसे याबाबतचा आढावा घेऊन प्रस्ताव सादर करणे विषयी मा. मंत्री, पाणी पुवठा व स्वच्छता विभाग यांनी निर्देश दिले. घाऊक पाणी पुरवठा न करता किरकोळ पाणी पुरवठा चालू करावा यासाठी घाऊक पाणी पुरवठा केंद्रे, किरकोळ पाणी पुरवठा केंद्र म्हणून रुपांतरीत करुन घेण्याची कार्यवाही करावी. तसेच प्राधिकरणाचा वार्षिक खर्च कमी करणेबाबत त्रयस्थ यंत्रणेची नेमणूक करुन त्यांचेकडून अहवाल मागवून घेऊन संचालक मंडळाच्या बैठकीसमोर सादर करण्याविषयी सूचित करण्यात आले.

उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने प्राधिकरणाचे सन २००३-०४ वर्षाचे लेखे स्वीकृत करण्यात येऊन सदरचे लेखे प्राधिकरणाच्या वतीने अध्यक्ष व सदस्य यांनी अधीप्रमाणीत करण्याचे ठरले व खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

१) सन २००३-०४ या वर्षाचे लेखे स्वीकृत करण्यात आले.

२) असाही ठराव करण्यात येत आहे की, सन २००३-०४ या वर्षाचे लेखे प्राधिकरणाच्या वतीने अध्यक्ष व सदस्य यांनी अधिप्रमाणीत करावेत.

३) असाही ठराव करण्यात येतो की, स्वीकृत लेख्यांमध्ये मांडण्यात आलेल्या कामाच्या निष्कर्षांमध्ये ज्याच्यामुळे कोणताही महत्वाचा फरक पडणार नाही. अशा किरकोळ स्वरुपाच्या दुरूस्त्या प्राधिकरणाच्या वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी व सदस्य सचिव यांच्या स्वाक्षरीने करता येतील.

४) असाही ठराव करण्यात येतो की, रु. १०५.७० लक्ष इतकी रक्कम कर्ज निवारण निधीकडे विनियोजित करावी.

५) सन २००३-०४ मध्ये लेख्यांमध्ये असलेले अधिक्य प्राधिकरणाच्या विहित उद्दिष्ट पूर्तिसाठी येत्या ५ वर्षामध्ये वापरण्यात येईल.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ४ : म.जी.प्रा.च्या सुधारित अंदाज २००४-२००५ व अर्थसंकल्पीय अंदाज सन २००५-०६ मान्यता मिळणेबाबत..**

प्राधिकरणाच्या सन २००४-०५ च्या सुधारीत अंदाजपत्रकावर तसेच सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबतची सविस्तर माहिती सदस्य सचिव तसेच वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी संचालक मंडळासमोर विषद केली. या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात येऊन खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाच्या सन २००४-०५ च्या सुधारित व सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास पुढे नमूद केल्याप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

**रुपये लाखात**

| अ.क्र. | तपशिल | सन २००४-०५ चे सुधारीत अंदाज | सन २००५-०६ चे अर्थसंकल्पिय अंदाज |
|---|---|---|---|
| १ | महसुली जमा | २३९१२.८० | २७१९९.९५ |
| २ | महसुली खर्च | २५२६४.५६ | २७०३४.७१ |
| ३ | भांडवली जमा | १२८६१९.९२ | १०१६१८.२७ |
| ४ | भांडवली खर्च | १२८६१९.९२ | १०१६१८.२७ |

असाही ठराव करण्यात येतो की, उपरोक्त प्रमाणे मंजूर झालेले सुधारीत अंदाजपत्रक व अर्थसंकल्प मंजूरीसाठी शासनाकडे सादर करावे.

**कार्यक्रम बाब क्र. ५ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या न्हावा-शेवा प्रकल्प क्षेत्र व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणा-या पाणी पुरवठा दराच्या सन २००५-२००६ साठी आढावा..**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या न्हावा-शेवा, प्रकल्प क्षेत्र व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणा-या पाणी पुरवठा करिता सन २००५-०६ साठी आकारावयाच्या दराबाबत सविस्तर माहिती वि.स.व मु.ले.अ. यांनी संचालक मंडळासमोर विषय केली. त्यावर पाणी पुरवठा योजनांतर्गत असलेली पाण्याची गळती कमी करणे, तसेच जास्तीतजास्त पाणी पट्टीची वसूली कशी होईल याकडे लक्ष देणेबाबत मा. मंत्री, पा.पु.स्व. यांनी

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

निर्देश दिले व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या न्हावा-शेवा, प्रकल्प क्षेत्र व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणा-या पाणी पुरवठा करिता सन २००५-०६ साठी आकारावयाच्या दरात वाढ न करता पूर्वीच्याच दराने पाणीपट्टी आकारण्यास मान्यता देण्यात येऊन खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येते की, सन २००४-०५ व सन २००५-०६ या वर्षी पाणी पुरवठा केंद्राच्या व्यवस्थापनेवर अपेक्षित अधिक्य विचारात न घेता सन २००५-०६ या वर्षासाठी पाणी पट्टीत वाढ न करता सध्याचेच दर आकारणी चालू ठेवावी.

**कार्यक्रम बाब क्र. ६ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आदिवासी क्षेत्रातील कार्यरत कर्मचा-यांना शासनाच्या धर्तीवर प्रोत्साहन भत्त्याची योजना लागू करणेबाबत.**

आदिवासी / नक्षलग्रस्त क्षेत्रातील कार्यरत कर्मचा-यांना शासनाच्या निर्णय क्र. सा.प्र.वि.क्र.टी.आर.एफ.-२०००/प्र.क्र.३/१२, दिनांक ६ ऑगस्ट, २००२ प्रमाणे अनुज्ञेय असलेल्या प्रोत्साहन भत्त्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आदिवासी / नक्षलग्रस्त क्षेत्रातील कार्यालयातील कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता लागू करणेबाबतच्या कार्यक्रम बाबी संबंधी सविस्तर माहिती श्री. आर. आर. जगताप. कार्यासन अधिकारी यांनी संचालक मंडळास विशद केली. त्यावर संचालक मंडळाने दिनांक ७.१२.२००४ च्या शासन निर्णयानुसार फक्त नक्षलग्रस्त म्हणून घोषित करण्यात आलेल्या तालुका व गावे, यामध्ये कार्यरत असणाऱ्या मजीप्रा कर्मचाऱ्यांनाच प्रोत्साहन भत्ता व एकस्तरीय पदोन्नतीचे लाभ दि. ६.८.२००२ च्या शासन निर्णयातील तरतुदींच्या अधीन राहून तसेच शासन मान्यतेच्या अटीस अधिन राहून संचालक मंडळाने मान्यता दिली व याबाबत पुढील कार्यवाही शासना बरोबर करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ७ :**

अ) **केंद्र शासनाच्या आदेशानुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना महागाई भत्त्यावरिल मुळ वेतनाच्या ५० टक्के एवढा महागाई भत्ता मूळ वेतनामध्ये विलीन करणेबाबत..**

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**ब) ५० टक्के महागाई भत्त्याचे / महागाई वाढीची सेवानिवृत्ती लाभांच्या प्रयोजनासाठी विलीनीकरण करणेबाबत.**

ज्या कर्मचाऱ्यांना ५ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन अदा करण्यात येत आहे त्यांना महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाचे निर्णय क्र. १-मभवा-११०४/प्र.क्र.५/सेवा-९, दिनांक १९ जुलै, २००४ व सेनिवे-१०९४/१८५/सेवा-४, दिनांक २० जुलै, २००४ अन्वये राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना महागाई भत्त्यावरिल मुळ वेतनाच्या ५० टक्के एवढा महागाई भत्ता मूळ वेतनामध्ये विलीन करणेबाबत व ५० टक्के महागाई भत्त्याचे / महागाई वाढीची सेवानिवृत्ती लाभांच्या प्रयोजनासाठी विलीनीकरण करणेबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. या अनुषंगाने प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे कार्यरत कर्मचाऱ्यांना वेतनांतर्गत लागू करण्यात आलेल्या आहेत. परंतु, निवृत्त वेतन धारकांना लागू करण्यात आलेले नाही असे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी संचालक मंडळासमोर सांगीतले. सदर लाभ कार्यरत व निवृत्त कर्मचाऱ्यांना लागू करणेबाबत संचालक मंडळाने मान्यता दिली. तथापि, मा. मंत्री, पा.पु.स्व. यांनी उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे प्राधिकरणांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना व निवृत्त कर्मचाऱ्यांना लाभ मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास मान्यतेस्तव सादर करावा असे सूचीत केले.

**कार्यक्रम बाब क्र. ८ : कुळगाव बदलापूर व अंबरनाथ पाणी पुरवठा वितरण व्यवस्था सुधार योजनासाठी शासकीय अनुदान व लोकवर्गणी वगळता उर्वरित निधीची उभारणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने करण्याबाबत.**

कुळगाव बदलापूर व अंबरनाथ पाणी पुरवठा वितरण व्यवस्था सुधार योजनासाठी शासकीय अनुदान व लोकवर्गणी वगळता उर्वरित निधीची उभारणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने करण्याबाबतच्या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, मजीप्रा, कोकण विभाग, ठाणे तसेच अधीक्षक अभियंता, मजीप्रा मंडळ, ठाणे यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. त्या अनुषंगाने संचालक मंडळाने कुळगाव-बदलापूर व अंबरनाथ शहराच्या प्रस्तावित पाणी पुरवठा वितरण व्यवस्था सुधार योजनांसाठी त्या त्या नगरपरिषदांच्या वर्गानुसार पाणी पुरवठा योजनांसाठी मिळणारे अनुदान वगळता उर्वरित निधी कर्ज स्वरुपात उभारण्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने घेण्यास मान्यता देण्यात आली. तथापि, या योजनेकरिता प्राधिकरणांमार्फत जे कर्ज उभारावयाचे आहे त्या करिता शासनाची हमी प्रथम प्राप्त करुन घेण्यात यावी. उपरोक्त पाणी पुरवठा योजनां महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजनां म्हणून शासनास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यास तसेच कालांतराने या

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

योजनांची मालकी इतर संस्थेकडे हस्तांतरीत करावी लागल्यास कर्ज व व्याजाच्या परतफेडीचे दायित्वासह तसेच योजनेवर शासनाव्दारे व मजीप्राव्दारे वेळोवेळी केलेल्या खर्चाच्या आजच्या मूल्यांकित किंमती (Present Worth) इतकी रक्कम संबंधित संस्थेकडून एकरकमी घेऊनच सदरच्या पाणी पुरवठा योजनां त्या संस्थेकडे हस्तांतरित होईल या अटिच्या अधिन राहून शासनाने प्रस्तुत योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनास कळविण्याची कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा, यांना प्राधिकृत करण्यात आले. तसेच पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल दुरूस्तीपोटी पूरवावयाच्या सेवे अंतर्गत वॉटर ऑडीट (Water Audit) व एनर्जी ऑडीट (Energy Audit) याबाबी समाविष्ठ करण्याबाबत सूचीत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ९ : पिंपरी (मेघे ) व ९ गावांची पा.पु. योजना. योजनेंतर्गत गावांच्या शहरीकरणामुळे दरडोई ७० ते ४० लि. मधील फरकाचा भांडवली खर्च म.जी.प्राधिकरणाने उभारण्याबाबत ..**

पिंपरी (मेघे) व ९ गावांची पाणी पुरवठा योजनेंतर्गत गावांच्या शहरीकरणामुळे शासकीय अनुदान वगळता उर्वरित निधीची उभारणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने करण्याबाबतच्या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विशद केली. त्या अनुषंगाने संचालक मंडळाने पिंपरी (मेघे) व ९ गावांची पाणी पुरवठा योजनेसाठी मिळणारे शासकीय अनुदान वगळता उर्वरित निधी कर्ज स्वरुपात उभारण्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने घेण्यास मान्यता खालील अटींच्या अधिन राहून देण्यात आली.

१) उपरोक्त पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजना म्हणून शासनास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यास तसेच कालांतराने या योजनांची मालकी इतर संस्थेकडे हस्तांतरीत करावी लागल्यास कर्ज व व्याजाच्या परतफेडीचे दायित्वासह तसेच योजनेवर शासनाव्दारे व मजीप्राव्दारे वेळोवेळी केलेल्या खर्चाच्या आजच्या मूल्यांकित किंमती (Present Worth) इतकी रक्कम संबंधित संस्थेकडून एकरकमी घेऊनच सदर पाणी पुरवठा योजना त्या संस्थेकडे हस्तांतरित होईल.

२) या योजनेची देखभाल व दुरूस्ती प्राधिकरणाव्दारे करण्याबाबत तसेच ती आर्थिकदृष्टया स्वंयसक्षम (Self Supporting) होण्याकरिता वेळोवेळी आवश्यक ते पाणीपट्टीचे दर सदस्य सचिव, मजीप्रा, यांनी आढावा घेऊन आकारण्यात यावेत.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

३) या योजनेकरिता प्राधिकरणामार्फत जे कर्ज उभारावयाचे आहे त्या करिता शासनाची हमी प्रथम प्राप्त करुन घेण्यात यावी.

उपरोक्त अट क्र. १ व २ च्या अधिन राहून शासनाने प्रस्तुत योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनास कळविण्याची कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा, यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. १०:अमरावती पाणी पुरवठा योजना टप्पा-२ अंतर्गत कामे करण्यासाठी कर्जाची उभारणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने करणेबाबत..**

अमरावती पाणी पुरवठा योजना टप्पा-२ अंतर्गत कामे करण्यासाठी रुपये ७५० लक्ष इतका निधी कर्ज स्वरुपात उभा करणेची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने करणेबाबतच्या कार्यक्रमबाबी विषयी सविस्तर माहिती मुख्य अभियंता, अमरावती तसेच सदस्य सचिव, मजीप्रा यांनी संचालक मंडळासमोर विशद केली. अमरावती पाणी पुरवठा योजना टप्पा-२ साठी रु. ७५० लक्ष इतका निधी कर्ज स्वरुपात उभा करण्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून घेण्यास खालील अटींच्या अधीर राहून मान्यता देण्यात आली.

१) सदरहू योजनेसाठी रु. ५०० लक्ष इतका निधी विदर्भ वैधानिक विकास महामंडळाकडून आधी प्राप्त होईल याची खात्री करावी व महापालिकेकडून आवश्यक ठराव प्राप्त करुन घ्यावा.

२) ही योजना मजीप्राची योजना म्हणून राबविण्यात येईल. मात्र कालांतराने या योजनेची मालकी नगरपालिका किंवा इतर संस्थेकडे हस्तांतरित करावी लागल्यास कर्ज व व्याजाच्या परतफेडीच्या दायित्वासह तसेच योजनेवर शासनाव्दारे व मजीप्राव्दारे वेळोवेळी केलेल्या खर्चाच्या आजच्या मूल्यांकित किंमती (Present Worth) इतकी रक्कम संबंधीत संस्थेकडून एकरकमी घेऊनच या योजनेची मालकी संबंधित संस्थेकडे हस्तांतरित होईल.

४) योजनेच्या मंजूर प्रशासकीय वित्तीय आकृतीबंधामध्ये व शासन निर्णयामध्ये सदर कर्ज उभारण्यापूर्वी शासनाकडून सुधारणा करुन घेणे.

५) या योजनेकरिता प्राधिकरणामार्फत जे कर्ज उभारावयाचे आहे त्या करिता शासनाची हमी प्राप्त करुन घेण्यात यावी.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

उपरोक्त अटींच्या अनुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ११ : वसई विरार उप प्रादेशिक पाणी पुरवठा योजना टप्पा-२ भाग-१ (सुर्या प्रकल्प उद्‌भव)**

**अ) १२१६ मि.मि. व १५५० मि.मि. व्यासाची मृदू पोलादी गुरुत्व वाहिनी टाकणे कंत्राटदारास जमवाजमव व सेक्युअर्ड ॲडव्हान्स प्रदान करणेबाबत..**

**ब) ७५० मि.मि. व्यासाची मृदू पोलादी गुरुत्व वाहिनी टाकणेबाबत..**

उपरोक्त कार्यक्रम बाबी संबंधि सविस्तर माहिती मुख्य अभियंता, मजीप्रा, कोकण विभाग, ठाणे यांनी विशद केली. त्यावर वसई विरार उप-प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेव्दारे सन-२००५ च्या उन्हाळयापूर्वी पाणी पुरवठा सुरू करण्याचे देण्यात आलेले उदिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने कंत्राटदारांना शासन मान्यतेने देण्यात आलेला सेक्युअर्ड ॲडव्हान्स / उचल देण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येऊन या पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. १२ : वाढीव मालेगांव पाणी पुरवठा योजना (गिरणा धरण उद्‌भव) जि. नाशिक स्विकृत निविदा क्र.ब-१/२१ सन १९९८-९९ करिता मृदू पोलादी पाईपसाठी एम.एस. पाईप्स् तारणावरील उचल देणेबाबत..**

उपरोक्त कार्यक्रम बाबी संबंधि सविस्तर माहिती सदस्य सचिव, मजीप्रा यांनी विषद केली. त्यावर वाढीव मालेगांव पाणी पुरवठा योजना (गिरणा धरण उद्‌भव), जिल्हा नाशिक, स्विकृत निविदा क्र.ब-१/२१ सन १९९८-९९ करिता मृदू पोलादी पाईपसाठी लागणाऱ्या एम.एस. प्लेटस् खरेदी करण्याकरिता दाबनलिकेचे काम मागे पडू नये म्हणून पहिल्या टप्प्यात ५०० मे.टन प्लेटस्वर इंडिमिनिटी बॉन्ड व तारणखत घेऊन देण्यात आलेल्या रु. १५८.२० लक्ष सेक्युअर्ड ॲडव्हान्स च्या कार्यवाहीस तसेच पुढील टप्प्यात ५६७ मे.टन प्लेटस्वर इंडिमिनिटी बॉन्ड व तारणखत घेऊन उचल देण्याच्या कार्यवाहीसही कार्योत्तर मान्यता देण्यात येऊन या पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १३ :कंत्राटदारास नोंदणीचे नुतनीकरणाच्या निकषांमध्ये कंत्राटदाराने केलेल्या कामाची वार्षिक उलाढाल व हाती असलेल्या कामाच्या रक्कमेमध्ये शिथिलता देणेबाबत..**

उपरोक्त कार्यक्रम बाबी संबंधी सविस्तर माहिती सदस्य सचिव, मजीप्रा यांनी विषद केली. मा. मंत्री महोदय, ग्राम विकास तथा म.जी.प्रा.चे सहअध्यक्ष यांनी सार्वजनिक बांधकाम विभांगतर्गत असलेल्या निकषांबाबतची माहिती विचारात घ्यावी असे सुचविले. यावर चर्चा होऊन सदस्य सचिव यांनी शिथिलता देणेबाबतची आवश्यकता विशद केली. कार्यक्रम बाब मंजूर करणेत आली व पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करणेत आले.

**कार्यक्रम बाब क्र. १४: राज्य सार्वजनिक उपक्रमाने शिल्लक निधी गुंतवण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वाच्या अनुषंगाने केलेल्या गुंतवणुकीस मान्यता मिळणेबाबत..**

सदरची कार्यक्रम बाब सविस्तरपणे संचालक मंडळाच्या पुढील बैठकीसमोर पुनश्च ठेवण्याबाबत मा. राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा म.जी.प्रा.चे उपाध्यक्ष यांनी निर्देश दिले.

**कार्यक्रम बाब क्र. १५: महाराष्ट्र शासनाने शासकीय वाहन चालकांना दिलेला वाढीव अतिकालीक भत्ता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील वाहनचालकांना लागू करणेबाबत..**

शासनाच्या वित्त विभागाच्या निर्णय क्र. अकाभ-१३०४/प्र.क्र.१८/सेवा-८, दिनांक १६ ऑगस्ट, २००४ प्रमाणे वाहन चालकांच्या अतिकालीक भत्यामध्ये सुधारणा केलेली आहे. त्या दराप्रमाणे प्राधिकरणांतर्गत कार्यरत असलेल्या वाहन चालकांना अतिकालीक भत्ता लागू करणेबाबतची बाब सविस्तरपणे श्री. आर. आर. जगताप, कार्यासन अधिकारी यांनी संचालक मंडळास विशद केली. त्यावर संचालक मंडळाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील वाहन चालकांना दरमहा देण्यात येणाऱ्या अतिकालीक भत्त्याची रक्कम त्या महिन्याच्या संबंधित कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनाच्या (Basic Pay) ५०% रक्कम किंवा त्या महिन्याच्या देय असलेल्या अतिकालीक भत्याची जी रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम अदा करण्यास मान्यता दिली व या संबंधिची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात आली.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १६: अंध अस्थीव्यंगाने अधू आणि कण्याच्या विकाराने पीडीत असणा-या म.जी.प्रा. च्या कर्मचा-यांना वाहतुक भत्ता मंजुर करणेबाबत..**

शासनाच्या वित्त विभागाच्या निर्णय क्र. वाहभ-१००३/प्र.क्र.६४/सेवा-५, दिनांक २ ऑगस्ट, २००४ प्रमाणे शासकीय (अंध व अपंग) कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वाहतुक भत्यामध्ये सुधारणा केलेली आहे. त्या दराप्रमाणे प्राधिकरणांतर्गत कार्यरत असलेल्या अंध व अपंग कर्मचाऱ्यांना वाहतुक भत्ता लागू करणेबाबतची बाब सविस्तरपणे श्री. आर. आर. जगताप, कार्यासन अधिकारी यांनी संचालक मंडळास विशद केली. त्यावर संचालक मंडळाने उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे प्राधिकरणांतर्गत कार्यरत असलेल्या अंध व अपंग कर्मचाऱ्यांना वाहतुक भत्ता लागू शासन मान्यतेच्या अटीस अधिन राहून करण्यास मान्यता दिली व त्या संबंधिची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यास मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र. १७: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वकिलांचे मानधनाचे दर निश्चित करणेबाबत..**

उच्च न्यायालय, जिल्हा न्यायालय व तालुका स्तरावरील न्यायालयातील प्राधिकरणाची प्रकरणे हाताळण्यासाठी वकीलांना अदा करावयाच्या मेहनताना बाबतची सविस्तर माहिती श्री. एस. पी. भातखंडे, कायदा व कामगार अधिकारी, यांनी संचालक मंडळास विशद केली. त्यावर संचालक मंडळाने प्रस्तावित केल्याप्रमाणे उच्च न्यायालय, जिल्हा न्यायालय व तालुका स्तरावरील न्यायालयातील प्राधिकरणाची प्रकरणे हाताळण्यासाठी पॅनलवर निवड झालेल्या वकीलांना मेहनताना म्हणून अनुक्रमे रु. ९००० एकत्रित, रु. ७००० एकत्रित व रु. ५००० एकत्रित या दराने अदा करण्यास मान्यता दिली. तसेच न्यायालयात दावा प्राधिकरणाच्या बाजून लागल्यास रु. १०००/- एवढे प्रोत्साहनात्मक मानधन व निकाल प्राधिकरणाच्या विरोधात गेल्यास रु. १०००/- संबंधित वकीलाच्या मानधनातून कपात करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र. १८: पुणे विद्यापीठ रस्ता रुंदीकरणासाठी म.जी.प्रा.चे विश्रामगृह पाडल्यामुळे पुणे येथे नव्याने विश्रामगृह बांधणेबाबत..**

सदरची कार्यक्रम बाब सविस्तरपणे संचालक मंडळाच्या बैठकीसमोर विशद करण्यात आली. याबाबत मा. मंत्री महोदय, पा.पु. व स्व. तथा म.जी.प्रा.चे अध्यक्ष यांनी लष्कर पाणी पुरवठा केंद्राला भेट देऊन उपलब्ध जागेमध्ये शासनाचा पैसा खर्च न करता BOT तत्वावर ही

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

जागा विकसित करावी व या जागेमध्ये मजीप्राची सर्व कार्यालये व पुढील काळातील गरजा लक्षात घेता या जागेस विकसीत करावे अशी सूचना केली. या सुधारित योजनेमध्ये विश्रामग्रहाचासुध्दा समावेश करावा असे निर्देश दिले.

**कार्यक्रम बाब क्र. १९: म.जी.प्रा.च्या उपविधी १९८९ मधील उपविधी क्र.३ कलम ७ व ८ गोंदिया पाणी पुरवठा योजनेतील जलमापक यंत्राच्या मासिक भाडयाबाबत सुधारित प्रस्तावाबाबत.**

म.जी.प्रा.च्या उपविधी १९८९ मधील उपविधी क्र.३ कलम ७ व ८ नुसार पाणी पुरवठा योजनेतील जलमापक यंत्राच्या मासिक भाडे सुधारित करणेबाबतच्या प्रस्तावाबाबत मा. सदस्य सचिव, मजीप्रा यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर सादर केली. यावर प्रस्तावित केलेप्रमाणे फक्त गोंदीया पाणी पुरवठा योजनेकरिता जलमापक यंत्राच्या मासिक भाडयांतर्गत सुधारण करण्यात यावी व सदरचे दर सर्व पाणी पुरवठा योजनांकरिता लागू करण्यापूर्वी पुन्हा एकदा सविस्तर प्रस्ताव मान्यतेस्तव पुढील संचालक मंडळाच्या बैठकीसमोर सादर करण्यात यावा असे ठरविण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.२०: स्थानिक स्वराज्य संस्थाकडील थकबाकी वसुलीसाठी पाणीपट्टीवरील विलंब आकार व कर्जावरील दंडनिय व्याज यात सवलतीच्या निर्भय योजनेस मुदतवाढीबाबत .**

सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सविस्तर माहिती वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी संचालक मंडळासमोर सविस्तरपणे विशद केली यावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव संमत केला.

**ठराव :**

१) मुळ निर्भय योजनेस १२ महिने मुदतवाढ (दि. १.३.२००५ ते दि. २८.२.२००६ पर्यंत) देण्यात येत आहे.

२) ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी / ग्राहकांनी यापूर्वी दुसऱ्या, तीसऱ्या व चौथ्या तिमाहीत रक्कम भरून अनुक्रमे ९०%, ८०% व ७०% लाभ घेतलेला आहे त्यांना देखील निर्भय योजनेचा कालावधी वाढविल्यामुळे १००% लाभ देण्यात यावा.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

३) मुळ निर्भय योजनेच्या शर्ती / अटींचे अधिन राहून, ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी मुळ निर्भय योजनेत भाग घेतला परंतू, त्यांनी थकबाकीची रक्कम संपूर्णतः भरणा केली नाही, त्यांनी निर्भय योजनेच्या पहिल्या सहामाहीच्या कालावधीत मुळ रक्कम पूर्ण भरल्यास विलंब आकार / दंडनीय व्याज यात १००% सवलत देण्यात यावी.

४) यापूर्वी सहभागी झालेल्या परंतू विहीत वेळेत रक्कम भरू न शकलेल्या व नव्याने सहभागी होणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्था / इतर ग्राहक यांनाही मुदत वाढीची निर्भय योजना लागू करण्यात यावी.

५) निर्भय योजनेच्या पहिल्या सहामाही कालावधी नंतर ज्या स्थानिक स्वराज्य संस्था / वैयक्तिक ग्राहक निर्भय योजनेचा लाभ घेऊ इच्छितात, त्यांना पहिल्या व्दिमासिकात ९०%, दुसऱ्या व्दिमासिकात ८०%, व तीसऱ्या व्दिमासिकात ७०% अशी विलंब आकार व दंडनीय व्याजामध्ये सुट देण्यात यावी.

असाही ठराव करण्यात येतो की, निर्भय योजनेच्या मुदत वाढीचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात यावा.

**कार्यक्रम बाब क्र.२१ : सन २००४-०५ या वर्षी कर्जरोख्याद्वारे निधी उभारण्याबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सविस्तर माहिती वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी संचालक मंडळासमोर सविस्तरपणे विशद केली असता सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाने सन २००४-०५ या वर्षामध्ये मालिका-११ व्दारे उभारलेले रुपये ५५.३४ कोटी व मालिका-१२ व्दारे उभारलेले रुपये ५८४.२० कोटी अशी एकुण रक्कम रुपये ६३९.५४ कोटी इतकी रक्कम ठेऊन घेण्यात यावी. उपरोक्त कर्जरोखे मालिका-१२ संबंधी आवश्यकतेनुसार करारपत्र करण्यास इतर कायदेशी बाबींची , पूर्तता करण्यास व विश्वस्तांकडे प्राधिकरणाची मालमत्ता गहाण ठेवण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.२२: मा.राज्यमंत्री महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन तथा उपाध्यक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांचेसाठी नवीन वाहन खरेदी करणेबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सविस्तर माहिती अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) यांनी संचालक मंडळासमोर सविस्तरपणे विशद केली असता सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली. स्कोडा वाहन खरेदी प्रकरणी उच्च न्यायालयात शासना विरुध्द एक जनहित याचिका प्रलंबित आहे. या याचिकेमध्ये उच्च न्यायालयाव्दारे देण्यात येणाऱ्या आदेशाच्या अनुषंगाने या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्याचे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र.२३: लातूर पाणी पुरवठा योजना, टप्पा-५ कार्यान्वित करणेबाबत..**

उपरोक्त कार्यक्रम बाबी संबंधि सविस्तर माहिती सदस्य सचिव, मजीप्रा यांनी विषद केली. त्यावर लातूर पाणी पुरवठा योजना, टप्पा-५, जिल्हा लातूर, स्विकृत निविदा क्र. ब-१/१ सन २००४-०५ व स्विकृत निविदा क्र. ब-१/६८ सन १९९८-९९ करिता अनुक्रमे रु.६० लक्ष इतकी अग्रीम रक्कम बिन व्याजी परंतु तेवढयाच रकमेची बँक गॅरंटी घेऊन व अशुध्द जल गुरूत्ववाहिनी व ब्रँच लिडींग मेन या कामाकरिता कंत्राटदारांना कॅश फ्लो उपलब्ध करुन देण्याकरिता चालू देयकातून कपात करण्यात आलेला सुरक्षा अनामत रकमेपैकी रु. ६० लक्ष इतकी रक्कम तेवढयाच रकमेची बँक गॅरंटी घेऊन कंत्राटदारास परत देण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येऊन या पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.२४: विजतंत्री पदांना कालबध्द पदोन्नतीची वेतनश्रेणी रु. ५०००-९००० मंजुर करणेबाबत..**

पाटबंधारे विभागाचा शासन निर्णय क्र. ओएनजी-१०७१/३६४६३/ई (२)-II, दिनांक १८.१.१९७५ अन्वये विजतंत्री / पाळी अभियंता या पदांचे पुढील पदोन्नतीचे पद कनिष्ठ अभियंता आहे. परंतु, ज्या विजतंत्री / पाळी अभियंता या पदावर कार्यरत कर्मचाऱ्याकडे विद्युत पदविका प्रमाणपत्र आहे तेच कर्मचारी कनिष्ठ अभियंता या पदावर पदोन्नतीसाठी पात्र ठरतात. परंतु, यापूर्वी ५/६ विजतंत्री / पाळी अभियंता या पदावर कार्यरत कर्मचारी की ज्यांच्याकडे वीज पर्यवेक्षकाचे प्रमाणपत्र आहे त्यांना कनिष्ठ अभियंता म्हणून पदोन्नती देण्यात आलेली आहे. ही कार्यवाही उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने विसंगत असल्याने संबंधित

| | |
|---|---|
| मा. अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्व. | सदस्य सचिव<br>म.जी.प्रा. |

कर्मचाऱ्यांना पदावनत का करण्यात येऊ नये अशा कार्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. वीज पर्यवेक्षकाचे प्रमाणपत्र हे पदविका प्रमाणपत्राशी तत्सम नाही असे अभिप्राय तंत्र शिक्षण मंडळाकडून प्राप्त झाले असल्यामुळे यापुढे पदविका प्रमाणपत्राशिवाय वीजमंत्री / पाळी अभियंता या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंता या पदावर पदोन्नती देता येणार नाही. तसेच यापूर्वी विद्युत पदविकेशिवाय कनिष्ठ अभियंता म्हणून पदोन्नती देण्यात आलेल्या आहेत अशा कर्मचाऱ्यांना पदावनत करण्याबाबतची कार्यवाी मा. सदस्य सचिव यांच्या स्तरावर करण्यात यावी असे संचालक मंडळाने निर्देश दिले.

संचालक मंडळासमोर चर्चेकरिता आणखी विषय नसलेमुळे उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे मा. अध्यक्ष यांनी घोषीत केले.

Board १०० Minutes

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.